# दहिसर आणि मुलुंडच्या चेकनाक्यांवर उभारणार कोविड केअर सेंटर



खास प्रतिनिधी● मुंबई

मुंबईतील अनेक भागांमध्ये क्वारंटाईनसह बाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या कोविड केअर सेंटरची संख्याही अपुरी पडत असल्याने आता मुंबईच्या सीमारेषेलाच आता नव्याने कोविड केअर सेंटर उभारण्यात येणार आहे. दहिसर आणि मुलुंड चेकनाक्यांच्या ठिकाणी ही सेंटर उभारली जाणार असून या सेंटरमध्ये ऑक्सिजन बेड जास्तीत जास्त उपलब्ध करून देण्याचा निर्णय करोना टास्कफोर्सने घेतला आहे.

वरळीतील एनएससीआय, नेस्को तसेच एमएमआरडीए मैदान,घाटकोपर तसेच इतर अनेक ठिकाणी जम्बो फॅसिलिटीची करोना केअर सेंटर उभारली जात असून त्यातील काही कार्यान्वित झाली आहेत, तर काही कार्यान्वित होण्याच्या तयारीत आहेत. वरळीतील एनएससीआयमध्ये अतिरिक्त १५० आयसीयूची व्यवस्था केली आहे. नेस्कोत १२४० खाटांऐवजी त्याची क्षमता २ हजार खाटांची करण्यात येणार आहे. यातील ७५० ते ८०० खाटांची सेवा सुरु होत आहे. परंतु मुंबईतील सध्याची स्थिती पाहता मुंबई बाहेरुनही रुग्ण येत असल्याने मुंबईच्या सीमेवरच अशाप्रकारची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दहिसरमधील जकात नाक्यांजवळ अर्थात चेक नाक्याजवळ ८०० खाटांचे क्वारंटाईन सेंटर उभारण्यात येणार आहे. यातील २०० खाटांवर ऑक्सिजनची सुविधा असेल. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने हे केंद्र उभारण्यात येणार आहे. याशिवाय बोरीवली, कांदळपाडा येथे २५० खाटांचे सेंटर उभारण्यात येणार आहे. त्यात उच्च क्षमतेचे सेंटर तसेच डायलिसीसची सुविधा असणारा आयसीयू विभागही असेल. ही कामे पुढील आठवड्यापर्यंत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन पूर्ण करणार आहे. याशिवाय टास्क फोर्सने मुलुंड जकातनाक्याच्या जागेवरही अशाचप्रकारे करोना केअर सेंटर उभारण्याची शिफारस केली आहे. मात्र याठिकाणी किती खाटा असतील याची माहिती महापालिका प्रशासनाने दिलेली नाही.